# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२०  दि. १६ऑक्टोबर, २०२०

(कृपया, आपल्या दैनिकाच्या जळगाव,धुळे व नंदूरबार आवृत्तीतून बातमी प्रसिध्द करावी, ही विनंती.)

जळगाव दि.१६ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या पदवी, पदविका व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्ष/अंतिम सत्राच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या पाचव्या दिवशी दुपारी ३ वाजेपर्यंत ९५टक्के विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा दिली. सायंकाळी उशिरापर्यंत परीक्षा सुरु होत्या.

विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा दि. १२ ऑक्टोबर पासून सुरू झाल्या आहेत. शुक्रवारी परीक्षेचा पाचवा दिवस होता. आज विविध विद्याशाखांच्या १८३ विषयांच्या परीक्षा होत्या. सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत झालेल्या परीक्षांच्या विविध सत्रात १६ हजार २३४ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा यशस्वीपणे दिली तर या सत्रात १८०० विद्यार्थ्यांनी ऑफलाईन परीक्षा दिली. सायंकाळी उशिरापर्यंत परीक्षा सुरु होती. अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक श्री. बी.पी. पाटील यांनी दिली. दुपारच्या सत्रात बी.ए. इंग्रजी विषयाच्या ऑनलाईन परीक्षेत पासवर्ड बाबत तांत्रिक अडचण काही काळ निर्माण झाली होती. मात्र ती दूर करण्यात आली. विद्यार्थ्यांना परीक्षेचा तेवढा कालावधी वाढवून देण्यात आला होता. बहि:स्थ् अभ्यासक्रमाच्या सकाळच्या सत्रात ९९ तर दूपारच्या सत्रात ८३ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा दिली.

बातमी क्र.२

जळगाव दि.१६ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि फैजपूर येथील धनाजी नाना कला, वाणिज्य् व विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्ता विद्यमाने हिंदी भाषा व साहित्या विकासात खान्देशचे योगदान या विषयावर ऑनलाईन कार्यशाळा घेण्यात आली.

या कार्यशाळेचे उदघाटन उत्‌तमविद्या समितीचे प्रमुख व प्रभारी कुलसचिव प्रा.बी.व्ही.पवार यांच्याहस्ते झाले. हिंदी साहित्यिक डॉ.पितांबर सरोदे व डॉ.तेजपाल चौधरी, हिंदी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ.सुनील कुळकर्णी उपस्थित होते. बीजभाषण गांधीवादी अभ्यासक डॉ.विश्वास पाटील यांनी केले.

डॉ.सुनील कुळकर्णी यांनी हिंदी भाषा व साहित्याच्या विकासात खान्देशातील साहित्यिकांनी मोलाची भर टाकली असल्याचे सांगून डॉ.शंकर पुणतांबेकर, डॉ.मु.ब.शहा, डॉ.पितांबर सरोदे, डॉ.विश्वास पाटील, डॉ.तेजपाल चौधरी आणि तापी विद्याप्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष लोकनेते मधुकरराव चौधरी यांच्या योगदानाचा उल्लेख केला. यावेळी वर्धा येथील हिंदी प्रचार समितीचे सहाय्यक मंत्री डॉ.हेमचंद्र वैद्य, डॉ.ओमप्रकाश शर्मा, प्रा.सतीश पाटील, डॉ.पुरुषोत्‌तम पाटील, प्रा.नवनाथ हरोळे, डॉ.विजय लावणे यांनी खान्देशातील विविध साहित्यिकांच्या योगदानावर प्रकाश टाकला. हिंदी विभागप्रमुख डॉ.कल्पना पाटील यांनी संयोजन केले होते. सूत्रसंचालन डॉ.ईश्वर ठाकूर, डॉ.विजय सोंजे यांनी केले. डॉ.सुनील कुळकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली समारोप झाला.

---

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या जळगाव, धुळे व नंदूरबार या तीन जिल्ह्याच्या आवृत्तीतून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी